- **संशोधनाची उद्दिष्ट्ये:- (Objectives of the Research):**

१) खानदेशातील लघु उद्योगांच्या विकासाचे अध्ययन करणे.

२) खानदेशातील लघु उद्योगांचा जनतेवर झालेल्या परिणामांचे अध्ययन करणे.

३) लघु उद्योगातील रोजगाराच्या संधींचा अभ्यास करणे.

- **गृहीतके :-(Hypothesis of the Research):**

१) खानदेशातील लघु उद्योगांचा विकास झालेला आहे.

२) खानदेशातील लघु उद्योगांचा जनतेवर अनुकूल परिणाम झालेला आहे.

३) खानदेशात लघु उद्योंगामुळे लोकांच्या उत्पन्नात वाढ झालेली आहे.

- **संशोधन पद्धती :-(Research Methodology):**

प्रस्तुत संशोधनात विश्लेषणात्मक संशोधन पद्धतीचा, सूक्ष्म अध्ययन पद्धतीच्या स्वीकार करण्यात आलेला असून यासाठी दुय्यम साधन- सामग्रीचा आधार घेण्यात आलेला आहे. दुय्यम साधन-सामग्रीसाठी संदर्भग्रंथ, संशोधन लेख, विविध मासिके, वर्तमानपत्रे व इंटरनेटचा वापर करण्यात आलेला आहे.

**स्पष्टीकरण :-** खानदेशात मोठ्या प्रमाणात गृहद्योगांना चालना मिळाली आहे. दिवसेंदिवस नवनवीन गृहउद्योग स्थापन होत आहेत.त्यामुळे खानदेशाच्या विकासात वाढ झाली आहे.गृहउद्योग म्हणजे कुटुंबातील बेरोजगारांना रोजगाराचे साधन मिळावे या उध्देशपुर्तीसाठी घरगुती उद्योग सुरु करणे होय.व्यक्ती,कुटुंब,समूहाला रोजगार व उदर्निर्वःचे साधन देणाऱ्या गृहद्योगांमध्ये जास्तीत जास्त खाण्यापिण्याचे पदार्थ तयार करणे,दैनंदिन लागणाऱ्या वस्तूंची निर्मिती करणे यांचा समावेश होतो. जपान,चीन,कोरियासारख्या देशांमध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तूंचे,उत्पादनाचे सुटे भाग तेथील घराघरातील महिलाच तयार करतात.भारतीय अर्थव्यवस्था हि विकसनशील अर्थव्यवस्था आहे तसेच भारतात लोकसंख्येचे प्रमाण जास्त आहे.त्यामुळे देशात शक्यतो दैनंदिन वापरात येणाऱ्या वस्तूंची निर्मिती,पारंपारिक उद्योग,अन्नपदार्थांची निर्मिती करणे असेच व्यवसाय गृहद्योगांमध्ये निवडले जातात .खानदेशात गृहद्योगांच्या मार्फत महिलांना मोठ्या प्रमाणात रोजगार मिळालेला आहे .महिलांमार्फत कापडी पिशवी तयार करणे ,केळी व बटाटे वेफर्स तयार करणे,पेन,पेन्सिल ,खडू तयार करणे,द्रोण पत्रावळी तयार करणे,चहा कप ,पेपरडिशेश तयार करणे,कुंकू तयार करणे,बिंदिया टिकली तयार करणे,दंतमंजन तयार करणे,चर्मोद्योग,लाकडी खेळणी बनविणे,चटया,पायदाने तयार करणे,मेणबत्ती,अगरबत्ती तयार करणे,विविध प्रकारची लोणची तयार करणे,पापड,कुरडई तयार करणे,शेवई तयार करणे,विविध प्रकारची चटणी तयार करणे,पेप्सीकोला तयार करणे,समोसे-पाणीपुरी मसाला पावडर तयार करणे,चिवडा ,फरसाण,शेव तयार करणे,गुलकंद,अशा अनेक प्रकारच्या वस्तू तसेच हस्तकलेपासून बनविल्या जाणाऱ्या वस्तू जसे की,मायक्रोन पासून तयार केलेले झुमर, मिरर ,फ्लावरपॉट, तोरण, झुला, स्कायकॅण्डल, मोबईल हेंगिंग असे अनेक प्रकारचे व्यवसाय खानदेशात गृहउद्योग म्हणून केले जातात.खानदेशातील गृहद्योगात निर्माण झालेल्या वस्तू आंतरराष्ट्रीय पातळीवर नावलौकिक झाल्या आहेत.विदेशी नागरिकांकडून या वस्तूंची मोठ्या प्रमाणावर मागणी केली जाते.

खानदेशातील गृहद्योगांना नवीन दिशा दाखवणारी जळगाव जिल्ह्यात पारोळा तालुक्यातील बहादरपूर येथील महिला निलिमा मिश्रा यांना गृहद्योगात उत्कृष्ट कामगिरी केल्याबद्दल 2011 मध्ये रमण मगशेस पुरस्कार तसेच 2013 मध्ये पद्मश्री पुरस्कार देऊन सन्मान करण्यात आला.निलिमा मिश्रा यांना बचतगटांच्या माध्यमातून ग्रामीण विकास साधता येईल हे लक्षात आले येथून प्रेरित होऊन त्यांनी 2000 मध्ये महिला सक्षमिकरणासाठी त्यांना रोजगार मिळऊन देण्यासाठी"भगिनी निवेदिता ग्रामीण विज्ञान निकेतन" या संस्थेची स्थापना केली.तसेच 2008 मध्ये निलिमा मिश्रा यांनी "भगिनी निवेदिता फाउन्डेशन"या संस्थेची स्थापना केली.त्यापासून अनेक बेरोजगार महिलांना रोजगार मिळाला आहे.

निलिमा मिश्रा यांनी पूर्व खानदेश व पश्चिम खानदेशात 1800 स्वयंसहाय्यता बचत गटांचे जाळे तयार करून महिलांना रोजगार उपलब्ध करून दिला आहे.बचत गटांच्या माध्यमातून 'गोधडी' बनवण्यास सुरुवात केली.बहादरपुरच्या 'गोधड्या'विदेशात लोकप्रिय झाल्या आहेत .निलिमा मिश्रा यांनी स्थापन केलेल्या दोन्ही संस्थांचे कार्य उत्तर महाराष्ट्राच्या जळगाव,धुळे,नंदुरबार,नाशिक या चार जिल्ह्यांमध्ये सुरळीत चालू आहे.निलिमा मिश्रा यांच्या अतुलनीय कार्यामुळे अनेक गरजू लोकांना रोजगार मिळालेला आहे आणि मिळत आहे.

गृहद्योगातील सर्वात महत्वाची आणि लोकांच्या आवडीची वस्तू म्हणजे केळी चिप्स होय.केळी चिप्सची सुरुवात 1999 मध्ये गाव साकळी,तालुका यावल,जिल्हा जळगाव येथील शोभाताई वाणी यांनी केली.सुरुवातीला त्यांना केळी चिप्स व्यवसायात यश आले नाही त्यांनी प्रयत्न सोडले नाहीत.शोभाताईंनी केळी चिप्सची जाहिरात केली.केळी वेफर्स लोकांना फुकट देखी वाटले.लोकांची केळी वेफर्स बद्धलची आवड वाढू लागली.येथून खर्या अर्थाने त्यांच्या व्यवसायाला सुरुवात झाली.शोभाताईंनी या प्रक्रियेला चालना देण्यासाठी त्यांच्या पती सोबत चर्चा करून 'निर्मल महिला गृहउद्योगाची'स्थापना केली.केळी चिप्स विक्रीत बर्यापैकी यश आल्या नंतर शोभाताईंनी केळी पासून तयार होऊ शकणाऱ्या अन्य पदार्थांकडे मोर्चा वळवला.त्यांनी केळीची पावडर तयार करून त्यापासून बिस्किटे, चिवडा, शेव, लाडू, गुलाबजाम आदी पदार्थ तयार केले.निर्मल महिला गृहउद्योग मार्फत वर्षभरात 10 ते 15 टन केळी चिप्स,15 टन चिवडा,शेव,बिस्कीट,लाडू,पीठ यांची विक्री होते.तर वर्षभरात सरासरी 150 टन कच्च्या केळीवर प्रक्रिया होते.त्यापासून तयार झालेल्या वस्तू मुंबई, पुणे, नाशिक, नागपूर, धुळे, जळगाव अशा अनेक ठिकाणी विकल्या जातात.त्यांच्या वस्तूंचे मोठ्या प्रमाणावर ग्राहकांचे जाळे तयार झाले आहे.निर्मल महिला गृहद्योगाची सुमारे 25 लाख वार्षिक उलाढाल होते.

अशा अनेक प्रकारचे गृहउद्योग खानदेशाच्या कान्या-कोपऱ्यात सुरु आहेत.खानदेशात गावोगावी महिला बचतगट स्थापन झाल्यामुळे काही महिला एकत्र येऊन बचत करतात आणि गृहद्योगाला सुरुवात करतात.त्यामुळे खानदेशात गृहउद्योग विकासात महिला बचतगटांचे महत्व नाकारता येत नाही.

खानदेशातील धुळे, नंदुरबार व जळगाव जिल्ह्यातील सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती व लोकांना मिळालेल्या रोजगार संख्या आणि त्या उपक्रमांत झालेली गुंतवणूक या संदर्भात सांखिकीय माहिती पुढील तक्त्यांच्या सहाय्याने

ISSN–2278-5655
AMIERJ Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023
OPEN ACCESS Original Research Article

दर्शवलेली आहे.

**जिल्ह्यातील तालुकानिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती.**

**जिल्हा- धुळे. संदर्भ वर्ष- २०२१-२२**

| अ.क्र. | तालुका | उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या) | रोजगार संख्या (लाख) | गुंतवणूक (₹ लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | शिरपूर | २७३ | २५९३ | ४७०.०० |
| २ | शिंदखेडा | १३६ | ७९९ | २३३.०० |
| ३ | साक्री | ३१५ | १२९० | ५४२.०० |
| ४ | धुळे | १०६५ | ५६३१ | १८३२.०० |
| एकूण | | १७८९ | १०३१३ | ३०७७.०० |

(स्रोत- महाराष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. जिल्हा धुळे (२७/०९/२०२२)

**जिल्ह्यातील तालुकानिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती.**

**जिल्हा- नंदुरबार. संदर्भ वर्ष- २०२१-२२**

| अ.क्र. | तालुका | उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या) | रोजगार संख्या (लाख) | गुंतवणूक (₹ लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | अक्कलकुवा | १३७ | ८३६ | ०.०० |
| २ | अक्राणी | ९६ | ५६७ | ०.०० |
| ३ | तळोदा | ५४२ | १११५ | ०.०० |
| ४ | शहादा | ८४६ | ३०१४ | ०.०० |
| ५ | नंदुरबार | १६६६ | ८०१५ | ०.०० |
| ६ | नावापुर | ७७२ | २८४१ | ०.०० |
| एकूण | | ४०५९ | १६३८९ | ०.०० |

(उद्यम रेजीस्ट्रेंशन मध्ये गुंतवणूक बाबतची आकेवारी दिसून येत नसल्याने गुंतवणूक शून्य (०.००) दर्शवण्यात आल्याचे संबन्धित यंत्रणेने कळवले आहे.)

(स्रोत- महाराष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. जिल्हा नंदुरबार. (३०/०९/२०२२)

ISSN–2278-5655
Aarhat Multidisciplinary International Education Research Journal
Volume–XII, Issue– VI (Special Issue-I) Nov – Dec, 2023
OPEN ACCESS Original Research Article

**जिल्ह्यातील तालुकानिहाय उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रमांची माहिती.**

**जिल्हा- जळगाव.** **संदर्भ वर्ष- २०२१-२२**

| अ.क्र. | तालुका | उद्योग आधार असलेले सूक्ष्म, लघु व मध्यम उपक्रम (संख्या) | रोजगार संख्या (लाख) | गुंतवणूक (₹ लाख) |
|---|---|---|---|---|
| १ | चोपडा | ५८७ | ०.०२ | ४१५८.०० |
| २ | यावल | ५२५ | ०.०२ | ३५४०.०० |
| ३ | रावेर | ७२० | ०.०३ | ५४८२.०० |
| ४ | मुक्ताईनगर | २६४ | ०.०१ | २२४६.०० |
| ५ | बोदवड | १६८ | ०.०१ | १३८८.०० |
| ६ | भुसावळ | १२३७ | ०.०५ | ९७९६.०० |
| ७ | जळगाव | ३६२३ | ०.१५ | २९५५२.०० |
| ८ | एरंडोल | ३०० | ०.०१ | २१९८.०० |
| ९ | धरणगाव | ३९८ | ०.०१ | २८१८.०० |
| १० | अमळनेर | ५४५ | ०.०२ | ३७५६.०० |
| ११ | पारोळा | ४८५ | ०.०१ | २५७६.०० |
| १२ | भडगाव | ४०३ | ०.०१ | २५१२.०० |
| १३ | चाळीसगाव | ९६९ | ०.०४ | ७१९२.०० |
| १४ | पाचोरा | ७०९ | ०.०३ | ५२२४.०० |
| १५ | जामनेर | ९१९ | ०.०३ | ६१२०.०० |
| एकूण | | ११८५२ | ०.४४ | ८८५५८.०० |

(स्रोत- महाराष्ट्र शासन, जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. जिल्हा नंदुरबार. (०७/०९/२०२२)

भारताला विकासाच्या यशोशिखरावर नेतानाच जागतिक महासत्ता म्हणून उदयास आणण्याचा प्रयत्न केंद्र सरकारच्या माध्यमातून होत आहे.देशाच्या विकासात महाराष्ट्राचे स्थान महत्वाचे आहे.त्यातूनच महाराष्ट्राच्या विकासात खानदेशाचा खारीचा वाटा आहे.केंद्र आणि राज्यसरकारने मिळून अनेक कल्याणकारी योजना आमलात आणल्या आहेत.खानदेशातील गरजूंनी त्यांचा फायदा घेतला पण अद्यापही काहींपर्यंत त्या योजना पोचल्या नाहीत किवा त्यांनी त्यांचा फायदा घेतला नाही.खानदेशाच्या विकासात अन्नदाता असलेला शेतकरी, कष्टकरी, कामगार, दलित, आदिवासी, महिला, युवक, व्यावसायिक, लघुउद्योजक यांची भूमिका महत्वाची आहे.

**खानदेशातील व्यवसायाच्या विविध संधी:**

खानदेशातील सुशिक्षित बेरोजगारांनी सरकारी नोकरीच्या अपेक्षेने न बसता व्यावसायिकतेच्या दिशेने वाटचाल केली पाहिजे.

- **अल्प भांडवली लघुउद्योग:** जे गृहउद्योग व लघुउद्योग कमी भांडवल व कमी गुंतवणुकीचे असतील अशा व्यवसायाची निवड करून आर्थिक परिस्थिती

बदलवण्याचा प्रयत्न केला पाहिजे.कमी भांडवलात व्यवसाय सुरु होऊ शकतो.लघुउद्योग कमी पैशात सुरु होतो.'अल्प भांडवलाच्या सहाय्याने कमी जागेत सुरु करता येणाऱ्या व्यवसायाला लघुउद्योग म्हणतात'.कमी मनुष्यबळ लागते,विशेष प्रशिक्षणाची आवश्यकता नसते.कच्चा माल सहज उपलब्ध होतो,पक्का माल स्थानिक बाजारपेठेत चांगल्या किमतीत विक्री करू शकतात किवा स्वतः गावोगावी जाऊन विक्री करू शकतो.अशा मालाची स्थानिक बाजारपेठेत चांगली मागणी असते.असे व्यवसाय पुढील प्रमाणे आहेत.विविध प्रकारच्या शाम्पू तयार करणे , साबण तयार करणे, डीटर्जंट पावडर तयार करणे, प्लास्टिकच्या पिशवी, कापडी पिशवी, पर्स तयार करणे, बॉलपेन, वह्या व रजिस्टर्स, ऑफिस फाईल तयार करणे, टाचण्या रबरी शिक्के तयार करणे, डाळ मिल, शर्ट तयार करणे, hanger तयार करणे, बुक बायंडिंग उद्योग, स्क्रीन प्रिंटींग, फिनेल उद्योग, खाद्यतेल उद्योग, पशुखाद्य उद्योग, प्लास्टिकच्या वस्तू तयार करणे, लिक्विड सोप, लिक्विड नीळ तयार करणे, बॉक्स Packing उद्योग, अत्तरे परफ्युम सेंट तयार करणे,रूम फ्रेशनर,फ्रेब्रीकेषण उद्योग, Gas ची उपकरणे, धातूंच्या वस्तू, भांडी तयार करणे, सायकली स्पोक अशा प्रकारचे उद्योग तसेच शेतीवर आधारित व्यवसाय देखील योग्य पर्याय ठरू शकतात.

- **शेतीवर आधारित लघुउयोग:**

खानदेशात शेतीपासून कोणीही लांब नाही,शेती संदर्भात प्राथमिक माहिती सर्व्यांना असतेच,तुम्ही जर शेतकरी कुटुंबातून असणार तर ग्रामीण भागात राहून शेतीशी निघडित असणारा व्यवसाय निवडला म्हणजे जवळ स्थानिक बाजारपेठ असतेच कच्चामाल कुठे मिळणार आणि पक्कामाल कोठे विकायचा या बाबतची चिंता उरत नाही.बेरोजगार नवउद्योजाकांना शेतीवर आधारित उद्योगांमध्ये भरपूर संधी उपलब्ध आहेत.असे उद्योग पुढीलप्रमाणे आहेत.उदा:- कृषी सेवा केंद्र,वनस्पतीजन्य कीटकनाशके, नर्सरी उद्योग, बिजोत्पादन उद्योग, कचर्यापासून बगीचा, सेंद्रिय खत, गांडूळ खत, आळंबी व नाडेप सेंद्रिय खत,ठिबक सिंचन सल्ला व सेवा उद्योग,भाजीपाला उत्पादन व विक्री व्यवसाय,शेळी पालन, मेंढी पालन, दुग्ध व्यवसाय, दुग्धजन्य पदार्थांचे उत्पादन व विक्री व्यवसाय, खवा निर्मिती, फळबाग, फुलबाग, आयुर्वेदिक वनस्पती लागवड,मसाला शेती, हंगामी फळ प्रक्रिया उद्योग, केसवर्धक आयुर्वेदी तेलाचे उत्पादन, Tomato सॉस प्रक्रिया उद्योग असे शेतीवर आधारित व्यवसायाची निवड तुम्ही करू शकतात.

- **नवनिर्मिती व्यवसाय किंवा आधुनिक व्यवसाय:**

21 व्या शतकात जागतिकीकरणामुळे नवनिर्मितीला उधान आले आहे. या उद्योगांमध्ये परंपारीकता नसून आधुनिकता आहे. नवीन काहीतारी करण्याचे उद्दीष्टे बाळगणाऱ्या नवउद्योजकांना आधुनिक उद्योगांमध्ये करिअर करता येण्यासारखे आहे,नवीन जगाची गरज पाहता,आधुनिक उद्योग पुढीलप्रमाणे आहेत उदा:- शेतीसाठी लागणारी आधीनिक यंत्र सामग्री,nutabolt औद्योगिक कंपन्यातील सुटे भाग बनविणे,स्टील,पितळी किवा अल्युमिनियम भांडी तयार करणे,मोबाईलचे लहान मोठे पार्टस बनविणे,दुचाकी वाहनांचे स्पेअर

पार्टस,मडगार्ड स्पोक्स बनविणे,क्लच वायर बनविणे,स्टेप-अप transaformar,फ्युज होल्डर,केबल क्लिप्स,मल्टीपिन कनेक्टर्स तयार करणे,चार्जिंग bataries तयार करणे,फोटो स्टुडियोतील लाईट ,टी व्ही चे टेबल stand बनवणे,ग्राफाइड पेंट,अल्युमिनियम पेंट बनविणे,स्टेपल पिन टाचण्या उद्योग,लीड पाईप,लीड tablet, गारमेंट उद्योग, नेटवर्क मार्केटिंग, सेटेलाईट केबल कनेक्शन उद्योग, ए. सी. उद्योग सीत उपकरणे तयार करणे, विजेवर चालणाऱ्या मोटारी, पंख्ये तयार करणे, सौंदर्य प्रसाधने, नेट कॅफे, सॉफ्तवेअर डेव्हलपमेंट, फळ प्रक्रिया उद्योग, एलईडी लाईट तयार करणे असे अनेक प्रकारचे उद्योग प्रशिक्षण घेऊन करता येऊ शकतात.

- **वस्त्र प्रावरणे गृह व लघुउद्योग:**

वस्त्र प्रावरणे व्यवसायात पिको-फाल, लेडीस टेलरिंग दुकान, फिरते कापड कपडे विक्री, कापडी पिशव्या तयार करणे, तयार कापडे व गांधीटोपी व्यवसाय करणे, पुरुषांचे तयार कपडे, सुरभी पिशवी व इतर वस्तू व्यवसाय, लोकरीचे कपडे विक्री करणे, पायदान व चटया विक्री करणे, गाड्यांचे कवर, त्रीपाल, पाल तयार करणे, असे उद्योगाची निवड तुम्ही करू शकतात.

- अन्न प्रक्रिया उद्योग:

आजच्या या जागतिकीकरण आधुनिकीकरण आणि औद्योगीकीकरणामुळे लोकांचे जीवनमानात बदलझालेला आहे. खाण्या-पिण्याच्या पद्धतीत फारच बदल झालेला आहे. बाहेर तयार झालेल्या पदार्थांना मागणी वाढलेली आहे. बाजारातील हॉटेल, खानावळी, ढाबे, बेकरी, फास्ट फूडची दुकाने, चायनीजचे पदार्थांचे गाडे यांची चलती आहे, असे निरीक्षणातून कळते. खाद्य पदार्थांची माहिती व बाजारपेठांची मागणी लक्षात ठेऊन नवद्योजक अनेक अन्नप्रक्रीया व्यवसायातून एखाद्या व्यवसायाची निवड करु शकतात. जसे की, काजु प्रक्रीया उद्योग, बेदाने प्रक्रिया उद्योग, विविध फळांवर प्रक्रिया करून त्यांचा पल्प तयार करणे, सॉस बनवणे, बिस्कीट उद्योग, मसाले उद्योग, लोणची उद्योग, वेफर्स उद्योग, गुलकंद उद्योग, विविध फ्लेवर्सची थंड पेय बनवण, चोकलेट उद्योग, गोळ्या, कॅन्डी, लोलीपोप उद्योग, खवा निर्मिती उद्योग, फळांपासून ज्यूस तयार करणे. अशा प्रकारचे शकडो अन्न प्रक्रिया उद्योगाची निवड करून आपले व्यवसाय स्थापन करू शकतात.

- **सेवा व्यवसाय:**

सेवा व्यवसाय देखील उत्तम पर्याय आहे.हे व्यवसाय कमी भांडवलात सुरु होऊ शकतात आपल्याकडील असलेले तांत्रिक ज्ञानाची,कौशल्याची,अनुभवाची,साधनांची सेवा गरज असेल त्या व्यक्तीला द्यायची त्याचा मोबदला म्हणून योग्य किंमत घ्यायची.या आधुनिक काळात पूर्णपणे परिस्थिती बदललेली आहे.नोकरदार असो किवा कामगार अशा सेवांची गरज प्रत्येकाला भासते.सेवा व्यवासायांचे ज्ञान स्वतः घेऊन व इतारांची गरज भागवून तुम्ही चांगले पैसे कमवू शकतात.सेवा व्यवसाय जसे की,नोकरी विषयक माहिती सेवा केंद्र,नेट कॅफे, वाचनालय, ग्रंथालय, कोचिंग क्लासेस, ट्रेवल्स एजन्सी, ड्रायविंग स्कूल, मसाज सेंटर, फिटनेस सेंटर, कोम्प्युटरचे प्रशिक्षण देणे, कुरिअर सेवा, fax व ई-मेल सेवा, बिल

भरणे व सल्ला सेवा, टेलिकॉम संबंधित सेवा,वधु-वर सूचक केंद्र, interrior डेकोरेशन, विविध समारंभाचे साहित्य पुरविणे, property सल्लागार,ठिबक सिंचन सल्ला व सेवा,कॅरम उद्योग,भांडी भाड्याने देणे, साउंड सिस्टम, रोषणाई भाड्याने देणे तसेच सायकल दुरुस्ती व सायकल विक्री दुकान ,पानठेला व कॅरम बोर्ड,दुचाकी वाहन धुलाई केंद्र,वाहनांमध्ये ग्रीस भरणे,चार चाकी वाहनांसाठी सर्विस स्टेशन,ट्रान्सपोर्ट सेवा देणे,असे अनगिनत व्यवसाय आहेत ज्यांची सेवा देऊन त्या व्यवसायात आपण भरारी घेऊ शकतो.बौद्धिककौशल्याचा चांगला वापर करता येणारी,बोलक्या स्वभावाची,धडपडी माणसे सेवा व्यवसायातून चांगले पैसे मिळवितात.

- **प्रशिक्षण व्यवसाय:**

अल्प किवा विशेष प्रशिक्षण घेऊन पुढील व्यवसायांची तुम्ही निवळ करू शकतात त्याच्यात मोबाईल रिपेरिंग,व्हिडीओ शुटींग आणि फोटोग्राफी,ब्युटीपार्लर,बेकरी उत्पादने,शिवणकाम,fashion डिझायनिंग,इलेक्ट्रीशेन,हॉटेल मनेजमेंट व केटरिंग technology,कॉम्प्युटर हार्डवेअर,सोफ्टवेअर रिपेरिंग,अन्न व फळ प्रक्रिया प्रशिक्षण,पशुपालनावर आधारित प्रशिक्षण (शेळी,मेंढी,शहामृग,गाय,म्हैस पालन ), packedging व मार्केटिंग (विक्रीकला ),सौर उर्जा ,biogas,नेडत खत तंत्रज्ञान,construction tech.,ऑफसेट तंत्रज्ञान,हर्बल कॉस्मेटिक,आयुर्वेदिक उत्पादन,मेणबत्ती उद्योग,कुटीर उद्योग प्रशिक्षण,फेशन तंत्रज्ञान,प्लास्टिक इंडस्ट्रीज,सोफ्ट टोईज, इंटीमेशन ज्वेलरी,हर्बलज्युस ,मिनरल water अशा अनेक प्रकारचे व्यवसाय तुम्ही करू शकतात.

खानेशातील परिस्थिती आता बदललेली आहे ,खानदेशाच्या विकासात गृहउद्योग आणि लघुउद्योग यांचा खारीचा वाट आहे. जे बेरोजगार तरुण,तरुणी,महिला नोकरीच्या शोधात असतील त्यांनी आपला मार्ग व्यवसायाकडे वळविणे फायद्याचे ठरू शकते,खानदेशात ज्या व्यवसायांना पोषक वातावरण असेल अशा व्यवसायाची निवड करून त्या संदर्भात थोडा अभ्यास करून व्यवसाय सुरु करू शकतात.

**निष्कर्ष:**

- खानदेशात लघुउद्योग व गृहउद्योगांमुळे बेरोजारांना काम मिळाले असून खानदेशातील गृहउद्योग हे महिला सक्षमीकरणाचे महत्वाचे साधन ठरले आहे.
- ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम होण्यास गृहउद्योग व लघुउद्योगांची हे महत्वाची भूमिका बजावत असतात, यातूनच खानदेशातील दारिद्र्य व बेरोजगारी कमी होण्यास मदत झालेली आहे.
- खानदेशातील लोकांच्या मनात लघुद्योग व गृहद्योगांच्या सहाय्याने सहकाराची भावना निर्माण होत असून त्याच्यातून लोकांना रोजगाराच्या अनेक संधी उपलब्ध होऊ शकतात व त्यांच्या आर्थिक व सामाजिक स्थितीत बदल होऊन राहणीमाणात सुधारणा होते.
- शिक्षण, आरोग्य, राहणीमानाच्या दर्ज्यात बदल घडून येतो.
- खानदेशातील गृहउद्योग व लघुउद्योगांचा राज्य व देशाच्या

आर्थिक व सामाजिक विकासात हाथभार लागला आहे.

**संदर्भ सूची :**


1) महाराष्ट्र शासन- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (धुळे जिल्हा-२०२२)
2) महाराष्ट्र शासन- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (नंदुरबार जिल्हा-२०२२)
3) महाराष्ट्र शासन- जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन. (जळगाव जिल्हा-२०२२)
4) एम.जी.मुजावर- यशस्वी उद्योग. (जीनियस पुब्लिकेशन कोल्हापूर-२०१८)
5) मिटकॉन स्वयंरोजगार केंद्र धुळे. (उद्योजगता व विकास कार्यक्रम)
6) www.di.maharashtra.gov.in
7) www.paisekagyan.com
8) www.wikipedia.org.
9) www.mr.vikaspedia.in.
10) www.loksatta.com.


*Cite This Article:*

Bhoi M.A & Prof.Dr. Rajput V. P. (2023). खानदेशाच्या विकासात गृह व लघु उद्योगांची भूमिका. In Aarhat Multidisciplinary International Education Research Journal: Vol. XII (Number VI, pp. 61–69). Zenodo. https://doi.org/10.5281/zenodo.10474730